सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००१४४-२०१५

## नियमित दिवाणी दावा क्र. ३१/२०१५

## निशाणी क्र.६० वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, सदरहू दाव्यातील प्रतिवादी क्र.१ रामजी यशवंत खोत हे दि.२१/१२/२०२४ रोजी दहिबाव येथे मयत झाले आहेत. वादीचे मुखत्यार आजारी असल्या कारणाने त्यांना त्यांचे वारसांबाबत माहिती व मृत्यूदाखला घेवून सदर प्रतिवादीचे वारस मुदतीत दाखल करता आले नाहीत. त्यामुळे सदर प्रतिवादी विरुध्द दावा अबेट झालेला आहे. प्रस्तुत दावा ताकिदीचे दादी करीता दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी यांचे मधील वादाचे अंतिम निराकरण होण्यासाठी मयत प्रतिवादीचे वारसांना दाव्याचे कामी समाविष्ट करणे आवश्यक आहे. तरी सदर कामी झालेला अबेटमेंट आदेश रद्द करणेत यावा व प्रतिवादीचे वारस अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे.

०४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी निरंतर ताकीद या करिता दाखल केलेला आहे.

०५. सदर कामी नि.क्र.६७ येथे प्रतिवादी क्र.१ रामजी यशवंत खोत यांच्या मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये

होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## - **आदेश** -

१. अर्ज नि.क्र.६० मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांस खर्चाची रक्कम रुपये २००/- देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र.१ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.10.06 16:34:36 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः०६/१०/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.